नि.फौ.ख.क्र. २२६२/२०२५
सरकार–वि–विकी सुरेश पवार
नि.क्र.१०

**व्ही.सी. प्रणाली द्वारे**
**अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्रमांक ०१ यांची जबानी–**
मी या द्वारे प्रतिज्ञापूर्वक निवेदन करते की,
नाव :–सुशिल किसनराव भंडलकर,
वय :– ४३ वर्ष, व्यवसाय :– नोकरी/रिक्षा चालक,
रा. :– आनंदवन सोसायटी, थेरगाव, पुणे

**सरतपासणी सहा. सरकारी अभियोक्ता श्री. जी.एम. बारगजे यांचेमार्फत शपथेवर सुरू** –
**०१.** सदर घटना दि. १०/०९/२०२५ रोजी लक्ष्मी ऑटो सर्व्हीसींग(servicing) सेंटर, पागेची तालकी शेजारी, चिंचवड गाव येथे घडली होती. दि. १०/०९/२०२५ रोजी सकाळी १०.३० वाजता मी माझी रिक्षा सदर सर्व्हीसींग (servicing) सेंटरला सव्र्हीसींग(servicing) साठी टाकली होती. दि. ११/०९/२०२५ रोजी सदर सव्र्हीसींग(servicing) सेंटरचा मुलगा नामे किशोर अडागळे हा माझी रिक्षा शोधत होता, त्यावेळी माझी रिक्षा चोरी झाल्याचे मला समजले. सदर चोरी झालेली रिक्षा ही बजाज ऑटो कंपनीची असुन तिचा क्र. एमएच१४/जीसी–९७११ असा होता. दि. ११/०९/२०२५ रोजी आम्ही दिवसभर माझी रिक्षा शोधण्याचा प्रयत्न केला, परंतु ती मिळुन आली नाही. त्यामुळे शेवटी मी संध्याकाळी पोलिस स्टेशनला त्याबाबत तक्रार दिली. आता मला माझा फिर्यादी जबाब दाखविण्यात आला, तो तोच असुन त्यातील मजकुर खरा व बरोबर आहे, त्यावरील सही माझीच आहे. सदर फिर्यादी जबाबास **नि.क्र. ११** देण्यात येतो. सदर चोरी झालेली रिक्षा पोलिसांना तपासाअंती मिळुन आल्यानंतर, पोलिसांनी माझ्याकडुन ५००/– रुपयाचा स्टॅम्प घेतला व गाडी मला परत केली. सदर रिक्षा विकी पवार नावाच्या इसमांनी चोरली होती हे मला पोलिसांकडुन कळाले व पोलिसांनी मला सदर आरोपी दाखवला आहे. मी आरोपीला पाहिल्यास ओळखु शकतो. आज रोजी आरोपी न्यायालयात व्ही.सी. द्वारे हजर आहे.
**सरतपास पुर्ण.**

**उलटतपास आरोपीतर्फे वकिल श्री. आर.व्ही. भिलारे यांच्यामार्फत सुरु–**

०२. हे म्हणणे खरे आहे की, चिंचवड पोलिस स्टेशन येथे गु.र.क्र. ३१६/२०२५ ही फिर्याद दि. ११/०९/२०२५ रोजी अनोळखी इसमाविरुध्द दिलेली होती. हे म्हणणे खरे आहे की, सदरील रिक्षा चोरताना मी आरोपीला प्रत्यक्षरित्या पाहिलेली नाही. हे म्हणणे खरे आहे की, दि. १०/०९/२०२५ रोजी माझी रिक्षा मी गॅरेजला सव्र्हीसींग(servicing) साठी दिली होती, त्यामुळे त्यावेळी सदर रिक्षाचा ताबा माझ्याकडे नव्हता. हे म्हणणे खरे आहे की, गाडी सव्र्हीसींग(servicing) करताना गॅरेजचे कर्मचारी सदरची गाडी टेस्टींगसाठी इकडे तिकडे फिरवतात. हे म्हणणे खरे आहे की, दि. १०/०९/२०२५ रोजी माझी रिक्षा मी सव्र्हीसींग(servicing) ला दिली, त्यावेळी गॅरेजला इतर गाडयांची गर्दी होती. हे म्हणणे खरे

नाही की, दि. १०/०९/२०२५ रोजी सदर सव्र्हीसींग (servicing) सेंटरचा कर्मचारी किशोर अडागळे हा माझी रिक्षा टेस्टींगसाठी घेवुन गेला आणि तिकडेच विसरला. हे म्हणणे खरे आहे की, या गुन्हयात चोरी झालेली रिक्षा मला मिळालेली आहे. हे म्हणणे खरे नाही की, मला सारखे सारखे न्यायालयात यावेसे वाटत नाही, त्यामुळे मला सदर खटला पुढे चालवायचा नाही. हे म्हणणे खरे नाही की, सदर तक्रार मी गैरसमजुतीतुन दिलेली आहे.

**उलटतपास पुर्ण.**

**फेरतपास** – नाही.

[illegible]

AUTI GAURI GHANASHAM

Digitally signed by AUTI GAURI GHANASHAM
Date: 2026.01.13 15:04:59 +0530

(जी. जी. औटी)

दिनांक : १२/०१/२०२६

**न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग,**
**(कोर्ट नं.६) पिंपरी, जि.पुणे.**

**CERTIFICATE**

I affirm that the contents of this P.D.F. file Order are the same, word to word, as per the original Order.

| | | |
|---|---|---|
| Name of the Stenographer | :- | B. S. Jamkhandi[Steno III] |
| Name of the Court | :- | G.G. Auti<br>6th Jt. CJJD & JMFC, Pimpri Pune. |
| Date | :- | 12.01.2026 |
| Order signed by the Presiding Officer on | :- | 12.01.2026 |
| Order uploaded on | :- | 12.01.2026 |